मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जुन्याच ठेकेदाराकडून काम पूर्ण करण्याचा विचार

## भामा आसखेड जलवाहिनीचे 70 टक्के काम पूर्ण; नवीन निविदेमुळे वर्षभर विलंबाचा अंदाज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पाच वर्षांपासून रखडलेल्या आणि तीन वेळा मुदतवाढ देऊनही ७० टक्केच पूर्ण झालेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे उर्वरित कामही संबंधित ठेकेदाराकडून करून घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. तत्कालीन आयुक्तांनी या ठेकेदाराला बडतर्फ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, नवीन निविदा प्रक्रिया केल्यास एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लागू शकेल, म्हणून जुन्याच ठेकेदाराला काम देण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे.



पिंपरी-चिंचवड शहराला सध्या मावळातील पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. शहरासाठी १६७ दशलक्ष लिटर पाणी आरक्षित असलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम रखडले आहे. सद्य:स्थितीत ७० टक्के काम पूर्ण झाले असून, ३० टक्के काम बाकी आहे.

मुदतवाढ देऊनही काम पूर्ण न झाल्याने तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी संबंधित ठेकेदाराला बडतर्फ केले. नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची तयारी प्रशासनाने केली. आता नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी लोकप्रतिनिधींबरोबर प्रत्यक्ष कामाची पाहणी केली असून, संबंधित ठेकेदाराच्या अडचणी समजून घेतल्या.

नवीन ठेकेदार नियुक्त केल्यास कामाला आणखी विलंब होईल. त्यामुळे जुन्या ठेकेदाराकडून काम करून घ्यायचे, की नवीन ठेकेदार नियुक्त करायचा, असा पेच प्रशासनासमोर होता. नवीन प्रक्रियेमुळे किमान वर्षभरापेक्षा अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे कामातील अडचणी सोडवण्यासह अटी व शर्तींच्या अधीन राहून काम करण्यास तयार असल्यास पूर्वीच्याच ठेकेदाराकडून जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यावर भर दिला जाणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

जलवाहिनीच्या ३० टक्के कामासाठी नवीन निविदा प्रक्रिया केल्यास एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लागू शकतो. त्यामुळे जुन्याच ठेकेदाराकडून अटी व शर्तींच्या अधीन राहून काम करण्याचे विचाराधीन आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### जलवाहिनी कामाची सद्यःस्थिती

- » ७० टक्के काम पूर्ण.
- » चार ठिकाणी काम पूर्णपणे ठप्प.
- » वाकी तर्फे वाडा येथे अशुद्ध जलउपसा केंद्राचे काम सुरू.
- » चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत १८.८० किलोमीटर, १४०० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू.
- » चिखलीत २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारणी.

### रखडपट्टीची कारणे

- » जलवाहिनीचा मार्ग बदलणे.
- » वन, सार्वजनिक बांधकाम, 'एमआयडीसी' कडून परवानगीस विलंब.
- » जागामालकांचा जागेचा ताबा देण्यास विरोध.
- » शेतकरी वारसांतील वादामुळे भूसंपादनास अडचण.

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात 5 नव्या पोलिस ठाण्यांना मान्यता

## पिरंगुट, जांबे, पिंपळे सौदागर, मोशी आणि देहूरोड भागांत स्वतंत्र पोलिस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या, नागरी विस्तार आणि गुन्हेगारीवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पाच नव्या पोलिस ठाण्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आयुक्तालयातील एकूण पोलिस ठाण्यांची संख्या २३ वरून २८ पर्यंत वाढणार आहे.




पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पिरंगुट, जांबे, पिंपळे सौदागर, मोशी आणि देहूरोड या भागांमध्ये स्वतंत्र पोलिस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर संबंधित भागातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षमपणे हाताळणे शक्य होणार आहे.

या नव्या पोलिस ठाण्यांसाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचीही निर्मिती होणार आहे. परिमंडळ ४ साठी ११ पदे, पिरंगुट पोलिस ठाण्यासाठी १९०, जांबे पोलिस ठाण्यासाठी १८९, पिंपळे सौदागर पोलिस ठाण्यासाठी १८३, मोशी पोलिस ठाण्यासाठी १९४ आणि देहुगाव पोलिस ठाण्यासाठी १९४ अशी एकूण ९६१ नवीन पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे नागरिकांना अधिक जलद पोलीस सेवा मिळणार असून, वाढत्या शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे. तसेच, स्थानिक पातळीवर गुन्हे नियंत्रण आणि तातडीच्या प्रतिसादातही मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### कायदा-सुव्यवस्थेसाठी मोठे पाऊल

» पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी पाच नव्या पोलिस ठाण्यांची प्रक्रिया सुरू झाली आहे. पिरंगुट, जांबे, पिंपळे सौदागर, मोशी आणि देहूरोड या भागांमध्ये स्वतंत्र ठाण्यांचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. या निर्णयामुळे आयुक्तालयातील एकूण पोलिस ठाण्यांची संख्या २८ वर जाणार आहे. याशिवाय ९६१ नवीन पदांची निर्मिती होणार असून नागरिकांना जलद आणि प्रभावी पोलीस सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

# गॅस टंचाईवर सरकारचा मोठा निर्णय; पाईप्ड गॅस जोडणीला वेग

## एमएनजीएलला 2 महिन्यांत जोडणी पूर्ण करण्याचे आदेश; दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर कॅबिनेटमध्ये नुकतीच चर्चा झाली. त्यानंतर अवघ्या बारा तासातच गॅस कंपनीच्या वितरकांची मुख्य सचिवांनी बैठक घेतली. यात पुढील दोन महिन्यांत नॅचरल गॅस कंपनीकडून पाइप्ड गॅस जोडणी पूर्ण केली जाणार आहे. त्यानुसार, कंपन्या, हॉटेल व्यावसायिकांना गॅसची तातडीने जोडणी देण्याच्या निर्देश दिले आहेत. याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी संबंधितांना दिला.

पुणे, मावळ शिवसेनेचे संपर्कप्रमुख झाल्यानंतर मंत्री सामंत यांनी शुक्रवार (दि. 3) आढावा बैठक घेतली. पिंपरी, चिंचवड, भोसरी, मावळ विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, युवती सेनेच्या कामाचा आढावा घेतला. थेरगाव येथे एका हॉलमध्ये शुक्रवार (दि. 3) बैठक पार पडली. शिवसेना उपनेते खासदार श्रीरंग बारणे यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, दोन महिन्यांत एमएनजीएल कंपनीकडून जेथे पाईप्ड कनेक्शन देणे शक्य आहे. तेथे लवकर देण्याच्या सूचना केल्या आहेत. वेगवेगळ्या कंपन्या, हॉटेल व्यावसायिक एमएनजीएलकडे पाठपुरावा करीत आहेत; मात्र यामध्ये काहीजण जोडणीबाबत जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्यास त्याची निश्चित दखल घेतली जाईल. त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यईल.

उद्योजकांना आणि त्यानंतर घरगुती गॅस वितरणाला कोणतीही अडचण येऊ नये, अशी आमची भूमिका आहे. दरम्यान, राज्य शासनाच्या निर्णयामुळे पुण्यात शेकडो पाइप्ड गॅसचे कनेक्शन घेतले आहे. तरी, उद्योजकांना ताकद देण्यासाठी आणखी प्रयत्न केले जाणार आहेत.



### पाइप्ड गॅस जोडणीला वेग

» राज्यातील गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी संबंधित कंपन्यांना पुढील दोन महिन्यांत पाइप्ड गॅस जोडणी पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः कंपन्या व हॉटेल व्यावसायिकांना प्राधान्याने गॅस पुरवठा करण्यात येणार आहे. जोडणी प्रक्रियेत टाळाटाळ करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. उद्योजकांना अडचण येऊ नये आणि घरगुती गॅस वितरण सुरळीत राहावे, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### ...तर पदावरुन दूर करणार

» शिवसेना संघटनेतील पदाधिकारी पदे घेऊन पक्षाचे काम करीत नाहीत. त्यामुळे त्यांना पदावर ठेवायचे की नाही, याबाबत निर्णय घेण्यात येईल. दरम्यान, लोकसभा मतदार कार्यकारिणी बरखास्त होऊन आताचे पदाधिकारी आजपासून प्रभारी म्हणून काम करतील. चांगले काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पदांवर कायम ठेवले जाईल, असा इशारा जिल्हा संपर्कप्रमुख, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिला. पुढील 30 दिवस मतदारसंघातील संघटनेच्या कामाची माहिती घेतली जाईल.

### इंद्रायणी, पवनेचा डीपीआर तयार

» इंद्रायणी, पवनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल अर्थात डीपीआर पूर्ण झाला आहे. तो पाच एजन्सीमार्फत करण्यात येणार आहे. त्यात एमआयडीसी, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए आणि पर्यावरण विभाग तसेच, अमृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडूनदेखील निधी मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. ते अंतिम टप्प्यात असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आरटीओची धडक मोहीम; पर्यावरण कर न भरल्यास कारवाई

## 15 वर्षांवरील वाहनधारकांवर लक्ष; वर्षभरात 9.56 कोटींची दंड वसुली

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) पर्यावरण कर वसुलीसाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. 15 वर्षे पूर्ण झालेल्या वाहनांसाठी हा कर अनिवार्य असून, तो न भरल्यास दंडासह व्याज आकारले जाणार आहे. सध्या शहरात आरटीओच्या वायुवेग पथकाची धडक मोहीम सुरू असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

आरटीओकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, या मोहिमेदरम्यान वर्षभरात 37 हजार 438 वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यातून 9 कोटी 56 लाख 90 हजार 295 रुपयांचा दंड वसुली करण्यात आली आहे. यावरून शहरात अनेक वाहनधारकांनी पर्यावरण कर भरण्याकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे.

विशेषतः 15 वर्षांपेक्षा जुनी वाहने लक्ष्य करून त्यांच्याकडून कर वसूल केला जात आहे. या मोहिमेत कर न भरलेल्या वाहनांना तत्काळ नोटीस दिली जाते. जागेवरच दंड आकारला जातो. आवश्यक असल्यास वाहन जप्त करण्याची कारवाईही केली जाते. पर्यावरण कराचा उद्देश केवळ महसूल गोळा करणे नसून, शहरातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे हा आहे. जुनी वाहने अधिक धूर व प्रदूषण निर्माण करतात. त्यामुळे अशा वाहनांची तपासणी करून ती सुरक्षित व पर्यावरणपूरक आहेत की नाही, याची खात्री करून घेतली जाते. हा कर भरल्यानंतर वाहनाला पुढील पाच वर्षांसाठी वाहन वैधता मिळते.

शहरातील काही वाहनधारक वाहतुकीच्या नियमांची पायमल्ली करीत आहेत. त्यामुळे पंधरा वर्षांहून अधिक वर्ष झालेली वाहने मोठ्या प्रमाणात धावत आहे. यामुळे होणारे प्रदूषण अधिक आहे. अशा वाहनधारकांना आरटीओकडून कर भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील चारचाकी वाहनांकडून सर्वाधिक चार कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. हा दंड भरताना वाहनचालकांकडून व्याजासहित रक्कम आकारली असून ती 29 लाख 45 हजार रुपये आहे. विशेषतः 15 वर्षांपेक्षा जुनी वाहने लक्ष्य करून त्यांच्याकडून कर वसूल केला जात आहे. या मोहिमेत कर न भरलेल्या वाहनांना तत्काळ नोटीस दिली जाते. जागेवरच दंड आकारला जातो. आवश्यक असल्यास वाहन जप्त करण्याची कारवाईही केली जाते.




### कर न भरल्यास जागेवरच दंड आकारणी

» पिंपरी-चिंचवड शहरात आरटीओच्या वायुवेग पथकाने विविध ठिकाणी तपासणी नाके उभारून वाहनांची तपासणी सुरू केली आहे. विशेषतः 15 वर्षांपेक्षा जुनी वाहने लक्ष्य करून त्यांच्याकडून कर वसूल केला जात आहे. या मोहिमेत कर न भरलेल्या वाहनांना तत्काळ नोटीस दिली जाते. जागेवरच दंड आकारला जातो. आवश्यक असल्यास वाहन जप्त करण्याची कारवाईही केली जाते.

# नुकसानग्रस्तांचे पंचनामे करून मदत देणार : महापौर मंजुषा नागपुरे

## नदीकाठच्या बांधकामांचा नव्याने सर्व्हे; पाणी निचरा वाढवण्यासाठी उपाययोजना वेगात

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या पावसाळा हा अनिश्चित कालावधीचा झाला असून कमी वेळेत अधिक पाऊस होत आहे. महापालिकेचे सर्व कर्मचारी रस्त्यावर उतरून काम करत आहे. नदी आणि नाले यांच्या बाजूला जी बेकायदा बांधकामे आहे त्याबाबत नव्याने सर्व्हे करून अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे उपस्थित होते.

मंजुषा नागपुरे म्हणाल्या की, अवकाळी पावसाने पुण्यातील विविध भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या आणि गंभीर परिस्थिती निर्माण झाली. एका ज्येष्ठ महिलेचा दुर्देवी मृत्यू झाला आणि अनेक नागरिकांच्या घरात पाणी देखील शिरले. याबाबत शुक्रवारी (दि.३) रोजी महापालिकेमध्ये संबंधित यंत्रणा यांची आपत्कालीन बैठक घेण्यात आली आहे.



### पाणी निचरा आणि सुरक्षेसाठी उपाय

» मनपा प्रशासनाने स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज लाईनची क्षमता वाढवण्यावर भर दिला असून, मोठ्या पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. शहरातील २२७ पूरग्रस्त ठिकाणी टप्प्याटप्प्याने उपाययोजना राबविण्यात येणार आहेत, त्यापैकी १२० ठिकाणी जूनपूर्वी कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. धोकादायक झाडांची छाटणी आणि ३२ धोकादायक वाड्यांचे स्थलांतरही एप्रिलपूर्वी करण्यात येणार आहे. वाढत्या शहरी विस्तारामुळे समस्या वाढल्या असल्या तरी पाणी साचू नये यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.

स्ट्रॉम वॉटरलाइन ड्रेनेज सफाई टेंडर कामाला सुरवात केली आहे. पावसाचे पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढवण्यासाठी पाईप लाइन आकार वाढविण्यात येणार आहे. झाडे छाटणी करणे हे केवळ पावसाळापूर्वी काम नसून वर्षभराचे काम आहे त्यास नियमानुसार परवानगी दिली जाईल. तशी सुरवात कामाची करण्यात आली आहे. मोठी झाडे यांचा आकार देखील कमी करून धोकादायक झाडे पावसाळ्यापूर्वी काढली जातील. ज्यांच्या घरात पाणी शिरले त्याबाबत पंचनामा करण्यात येईल. जी महिला मयत झाली आहे त्यांच्या कुटुंबांना पाच लाखांची आर्थिक मदत देण्यात येईल.तसेच अतिरिक्त दोन लाख निधी देण्यात येईल.

मनपा आयुक्त नवल किशोर राम म्हणाले की, कालचा पाऊस हा एक तासात १०४ मिमी झाला आहे. मनपा प्रशासन मध्ये काही ठिकाणी कामे पूर्ण होत नसतील पण कामे सातत्याने सुरू असतात. दोन ठिकाणी ढगफुटी घटना घडल्या आहे. शहराचा व्याप हा आता पूर्वीपेक्षा वाढलेला आहे. २२७ ठिकाणी कामे करण्याची गरज आहे. त्याला तीन विभागात विभागणी करून कामे करण्यात येईल. २२७ पैकी १२० ठिकाणी जून पूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण करण्यात येतील. वर्षानुवर्ष काही ठिकाणी पाणी साचणे घटना घडत आहे त्यांचा यात समावेश आहे. २४ तासात झाड काटणीसाठी परवानगी देण्यात येईल. प्रत्येक वॉर्डला दहा लाख निधी कामासाठी देण्यात येतो. परंतु खर्च काही वॉर्डत कमी अधिक खर्च लागत असल्याने तशाप्रकारे सूचना दिल्या आहे. शहरात ३२ ठिकाणी धोकादायक वाडे असून एप्रिल पुर्वी त्यांचे स्थलांतर करण्यात येणार आहे.

### आपत्कालीन बैठकीत महत्त्वाचे निर्णय

» पुण्यात अवकाळी आणि मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीची पावले उचलली आहेत. महापौर मंजुषा नागपुरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, शहरात पाणी साचण्याच्या घटनांमुळे आपत्कालीन बैठक घेऊन विविध उपाययोजना ठरविण्यात आल्या. नदी आणि नाल्यांच्या काठावर असलेल्या बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी नव्याने सर्व्हे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पावसामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या घरांचे पंचनामे करून मदत दिली जाणार असून मृत महिलेच्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य जाहीर करण्यात आले आहे.

# ‘पीएमआरडीए’ हद्दीत हक्काच्या घरांसाठी ॲक्शन प्लॅन : आयुक्त अभिजित चौधरी

## 674 गावांतील लाभार्थ्यांना दिलासा : प्रशासनाने सक्रियपणे काम करण्याचे आयुक्तांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील पंतप्रधान आवास योजनेला गती देण्यासाठी विशेष ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत केवळ अर्ज स्वीकृतीपुरते न थांबता पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष घरांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने सक्रियपणे काम करावे, असे सक्त निर्देश आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे पीएमआरडीएच्या ६७४ गावांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.




अभियांत्रिकी विभागाच्या आढावा बैठकीत बोलताना आयुक्त चौधरी यांनी योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडथळ्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ‘शहरस्तरीय तांत्रिक कक्ष’ स्थापन करण्यात येणार असून, आवश्यक तज्ज्ञांची पदे लवकरात लवकर भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच ‘लाभार्थी आधारित बांधकाम’ आणि ‘भागीदारीतून परवडणारी घरे’ या घटकांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनुभवी संस्थांची नियुक्ती केली जाणार आहे. पंतप्रधान आवास योजना-२ अंतर्गत गावठाण भागातील प्रस्तावांनाही मंजुरी देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येणार असल्याचे संकेत आयुक्तांनी दिले. ग्रामीण व निमशहरी भागातील वाढती लोकसंख्या आणि घरांची गरज लक्षात घेता हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, परवडणाऱ्या घरांसाठी जमीन उपलब्धतेचा प्रश्न सोडवण्यासाठी पीएमआरडीए हद्दीतील नऊ तालुक्यांमध्ये मोक्याच्या शासकीय जागांचा शोध घेण्याची मोहीम हाती घेतली जाणार आहे. या जागांवर ‘एएचपी’ घटकांतर्गत गृहप्रकल्प उभारण्याचा आराखडा तयार केला जाणार असून, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान एक प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या निर्णयामुळे पीएमआरडीएच्या ६७४ गावांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### गावठाण प्रस्तावांना गती

» पंतप्रधान आवास योजना-२ अंतर्गत गावठाण भागातील प्रस्तावांनाही मंजुरी देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येणार असल्याचे संकेत आयुक्तांनी दिले. ग्रामीण व निमशहरी भागातील वाढती लोकसंख्या आणि घरांची गरज लक्षात घेता हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे प्रलंबित प्रस्तावांना गती मिळून सर्वसामान्यांचे ‘स्वतःचे घर’ हे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

# नदी प्रदूषणामुळे हवेलीतील शेती संकटात; उत्पादनावर परिणाम

## दूषित पाण्यामुळे पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्यावर परिणाम; शेतकऱ्यांची तीव्र नाराजी

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठा नदीत प्रक्रिया न करता सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे हवेली तालुक्यातील शेतीवर परिणाम होत आहे. सांडपाणी आणि रसायनमिश्रित पाण्यामुळे परिसरातील शेतजमीन नापीक होत आहे. पिकांची वाढ खुंटली असून, उत्पादनात मोठी घट झाली आहे. विषारी पाणी जमिनीत झिरपल्याने विहिरी आणि बोअरवेल्सचे पाणी दूषित झाल्याचे शेतकरी सांगत आहेत.

हवेली तालुक्यातील तेवीसहून अधिक गावांतील शेतीला मुळा-मुठा नदीतील दूषित पाण्याचा फटका बसत आहे. सांडपाणी आणि रसायनमिश्रित पाण्याचे दूरगामी परिणाम आता दिसू लागले असून, शेतजमीन नापीक होत आहे. तसेच, पिकांची वाढ देखील खुंटत आहे. शेतीच्या उत्पादनातही मोठी घट झाली आहे. प्रदूषित पाण्यामुळे परिसरात डासांचे प्रचंड प्रमाण देखील वाढले आहे. एकीकडे शेतकऱ्यांना विषारी पाणी मिळत असताना दुसरीकडे पाटबंधारे विभाग त्यांच्या कूपनलिकांवर 'वॉटर मीटर' बसवून पाणीपट्टी वसूल करीत आहे. 'घाण पाणी द्यायचे आणि वरून पैसेही वसूल करायचे,' अशा शब्दांत या गावांतील शेतकरी संताप करीत आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुळा-मुठा नदीतील प्रदूषणाची पातळी धोक्याच्या पातळीच्या पलिकडे गेल्याचे नमूद केले आहे. मात्र, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही महापालिका यावर ठोस उपाययोजना करताना दिसत नसल्याने या गावांतील ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे. या प्रश्नाबाबत आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी विधानसभेत नुकतीच लक्षवेधी मांडली. या लक्षवेधीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी महापालिकांवर दंडात्मक कारवाईचा इशारा दिला आहे.

सांडपाण्यापैकी 6.20 टीएमसीवर प्रक्रिया केली जाते. उर्वरित सांडपाणी थेट मुळा-मुठा नदीत सोडले जात असल्याने नदी प्रदूषित होत आहे. नियमांनुसार सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया करूनच ते नैसर्गिक प्रवाहात सोडणे बंधनकारक आहे; अन्यथा दुप्पट दराने आकारणीसह दंडाची तरतूद आहे. महापालिकेला सूचना देण्यात येत असल्याचेही विखे-पाटील यांनी अधिवेशनात सांगितले आहे.



### जलप्रदूषणामुळे बाधित गावे

» **हिंगणगाव, खामगाव टेक, टिळेकरवाडी, भवरापूर, अष्टापूर, शिंदेवाडी, शिरसवाडी, बिवरी, वाडेबोल्हाई, पेठनायगाव, थेऊर, मांजरी बुद्रुक, मांजरी खुर्द, प्रयागधाम, कोलवडी साष्टे, केसनंद, आव्हाळवाडी यांसह अनेक गावांतील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना जलप्रदूषणाचा फटका बसत आहे.**

> **मुळा-मुठा नदीतील जलप्रदूषणाचा फटका हवेली तालुक्यातील तेवीसहून अधिक गावांना बसत असून, शेकडो हेक्टर शेती नापीक होण्याच्या मार्गावर आहे. या प्रश्नावर नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या अधिवेशनात लक्षवेधी मांडली. हा प्रश्न सोडविण्यासाठी आगामी काळात देखील पाठपुरावा करणार आहे.**
>
> **- ज्ञानेश्वर कटके, आमदार**

> **पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते मुळा-मुठा नदीत सोडत आहेत. तसेच परिसरातील उद्योगाचे रसायनमिश्रित पाणीही नदीपात्रात सोडले जात असल्याने शेतीचे उत्पादन घटले आहे असून, जमिनीची गुणवत्ता कमी झाली आहे. नदीकाठच्या गावांना पिण्यासाठी शुद्ध पाणीही मिळत नाही. प्रशासनाने जलप्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.**
>
> **- अशोक आव्हाळे, शेतकरी, मांजरी खुर्द**

# ऑपरेशन फ्लश आऊटला वेग; पुण्यात 12 दिवसांत 166 गुन्हे दाखल

## अवैध दारू, शस्त्रे आणि अमली पदार्थांवर पोलिसांची मोठी कारवाई; मोठा मुद्देमाल जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध शस्त्रे, अमली पदार्थ आणि दारू विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार 'ऑपरेशन फ्लश आऊट'ला वेग आला आहे. 20 ते 31 मार्च या 12 दिवसांच्या कालावधीत एकूण 166 गुन्हे दाखल करण्यात आले.

या मोहिमेदरम्यान बेकायदा बाळगणाऱ्यांविरुद्ध आर्म्स ॲक्टअंतर्गत 29 गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच अमली पदार्थांच्या विक्री व साठ्याविरोधात एनडीपीएस कायद्यान्वये 13 गुन्हे नोंदवण्यात आले. या कारवायांमुळे गुन्हेगारी नेटवर्कला मोठा धक्का बसल्याचे पोलिसांनी सांगितले. अवैध दारू विक्रीविरोधातही पोलिसांनी आक्रमक भूमिका घेत 31 मार्चपर्यंत 166 गुन्हे दाखल केले. या प्रकरणांमध्ये 134 आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, सुमारे 5 लाख 81 हजार 785 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी 'ऑपरेशन फ्लश आऊट' अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाई केली. जप्त मालामध्ये 2 हजार 199.9 लिटर गावठी दारू, 108.58 लिटर विदेशी दारू, 40 लिटर ताडी व 20 लिटर रसायनाचा समावेश आहे. याशिवाय 1,337 दारूच्या बाटल्या तसेच 153 गुटखा व तंबाखूची पाकिटेही जप्त करण्यात आली. रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांवर तसेच अशा प्रवृत्तीला प्रोत्साहन देणाऱ्या अवैध हातगाड्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई केली. महाराष्ट्र पोलिस अधिनियमान्वये 195 व्यक्ती व हातगाड्यांवर कारवाई करण्यात आली आहे.



### कारवाईत गुन्हेगारी नेटवर्कला धक्का

» **शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी 'ऑपरेशन फ्लश आऊट' अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाई केली. २० ते ३१ मार्चदरम्यान १६६ गुन्हे दाखल करण्यात आले. आर्म्स ॲक्टअंतर्गत २९ तर एनडीपीएस कायद्यान्वये १३ गुन्हे नोंदवले गेले. अवैध दारू विक्रीविरोधातही कठोर पावले उचलण्यात आली. या मोहिमेत १३४ आरोपींवर कारवाई करत सुमारे ५.८१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामुळे शहरातील गुन्हेगारी नेटवर्कला मोठा धक्का बसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.**

> **'ऑपरेशन फ्लश आऊट' या मोहिमेत 166 हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नागरिकांनीही सतर्क राहून त्यांच्या परिसरात अवैध शस्त्रे, अमली पदार्थ किंवा दारू विक्री होत असल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी. संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्यात येईल.**
>
> **- अमितेश कुमार, पोलिस आयुक्त**